Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# व्यक्तिरेखेच्या आयुष्यातील वर्तमानाचा उभा आडवा छेद घेणारी कादंबरी- 'एका आरंभाचे प्रास्ताविक' - रंगनाथ पठारे

**प्रा. डॉ. पंडित गंगाधरराव रानमाळ**
मराठी विभागप्रमुख
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.

रंगनाथ पठारे यांनी मराठी कथात्मक वाङ्मयात १९८० च्या दशकापासून एक वेगळे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले आहे. रंगनाथ पठारे यांनी कादंबरी लेखन, कथा लेखन, टीकालेखनही केले आहे. यामध्ये अधिकच्या क्षमतेने त्यांनी केलेले कादंबरी लेखन हे महत्त्वपूर्ण, आशयसमृद्ध आहे. त्यांनी 'दिवे गेलेले दिवस', 'रथ', 'चक्रव्यूह', 'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'ताम्रपट', 'दुःखाचे श्वापद', 'नामुष्कीचे स्वगत', 'त्रिधा', 'कुठेचे लोलक', 'भर चौकातील अरण्यरुदन', 'चोषक फलोद्यान', 'एका आरंभाचे प्रास्ताविक' इ. कादंबरीलेखन केले आहे. अशा एकूण १३ कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. 'अनुभव विकणे आहे', 'तीव्र कोमल दुःखाचे प्रकरण', 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग', 'ईश्वर मृतात्म्यास शांती देवो', 'गाभ्यातील प्रकाश', 'चित्रमय-चतकोर', 'शंखा तील माणूस' हे कथासंग्रह, 'सत्त्वाची भाषा' व 'आस्थेचे प्रश्न' इ. लेखसंग्रह 'कविचे अखेरचे दिवस' आणि 'निशिगंध इरेदिरा' हे अनुवादपर पुस्तक लेखनही त्यांनी केले आहे.

आपल्या लेखनात विविध प्रयोग करणारे आणि समकालीन वास्तवता सहज संवेदनाने पकडण्याचा प्रयत्न करणारे, विस्तृत जीवनानुभवांना सामावून घेण्याचे सामर्थ्य असणारे व कादंबरी लेखनात आशय व शैलीचा नवीन आविष्कार करणारे एक सामर्थ्यशाली कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांचे मराठी साहित्यविश्वात एक महत्त्वपूर्ण नाव घेतले जाते. त्यांची 'एका आरंभाचे प्रास्ताविक' ही शब्दालय प्रकाशनाने सन २०१३ मध्ये प्रसिद्ध केलेली २७२ पृष्ठांची महत्त्वपूर्ण कादंबरी आहे.

रंगनाथ पठारे यांची 'एका आरंभाचे प्रास्ताविक' ही कादंबरी समाजातील बदल, व्यक्तीचे आत्मशोधाचे प्रयत्न, नातेसंबंधातील गुंतागुंत आणि नव्या जीवनमूल्यांच्या शोधाचा वेध घेते. जुन्या आणि नव्या विचारसरणीमधील संघर्ष, व्यक्तीच्या मानसिक घडामोडी आणि सामाजिक वास्तव यांचे सूक्ष्म चित्रण या कादंबरीत आढळते. जीवनातील नव्या सुरुवातीच्या शक्यता आणि त्यातील आव्हाने हा कादंबरीचा केंद्रबिंदू

आहे. या कादंबरीमध्ये मनुष्यस्वभावाच्या विश्लेषणाचं एक वेगळच अंग दाखविणारं किंवा आजच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीबाबतचं वास्तव रोखठोकपणे मांडणारं भाष्य अधूनमधून अगदी सहजपणानं येतं आणि वाचकाला विचारात पाडते.

या कादंबरीमध्ये लमुवेल, बाणखेले, जकाते , चामुंडा, तुंगाक्का या व्यक्तिरेखेची उभ्या आडव्या विस्तीर्ण पट उभा करत जाते. लेखकाने या व्यक्तिरेखांचे चित्रण तर मांडलेच, त्याबरोबर मानवी जीवनाबाबतचं आपल चिंतन आणि भूतकाळाच्या खांद्यावर स्वार असलेल्या वर्तमानाचे थेट चित्रण करण्यासाठी त्यांनी या साऱ्या व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. या व्यक्तिरेखा उभ्या करताना त्यांच्या कृतीतून त्या वाचकांसमोर उभ्या राहतात. त्यांच्या जीवनातील ताणतणाव, हर्षविमर्ष, आनंद आणि दुःख, वेदना व सुख, अपेक्षा व अपेक्षाभंग, वासना व विकार अत्यंत प्रत्ययकारकरित्या पठारे वाचकांपर्यंत पोहचवतात.

लमुवेलच्या नितळ मनाचा सरळपणाही आपल्याला भावतो. तुंगाक्काच्या मनाचा टनकपणा जसा लक्षात येतो, तसाच तिच्या मनातला हळुवार कोपरा आणि वर्षानुवर्ष तिने मनाच्या गाभाऱ्यात जपून ठेवलेलं उत्कट, निरपेक्ष प्रेमही आपल्यापर्यंत पोहचतं. जकार्तेचं कावेबाज वागणं, त्याच्या दोन बायका, अजाणवयातील तिसरीबरोबर त्यांनी उधळलेले गुण, त्यांचा स्त्रीलंपटपणा, हवं ते साध्य करून घेण्यासाठी ते रचत असलेले डाव, माणसाचं मन एखाद्या उघड्या पुस्तकाप्रमाणे वाचणारे बेडर स्वभावाचे आणि दणकट शरीराचे पोलीस इन्स्पेक्टर बाणखेले, यांची साहित्याची आवड आणि गुन्हेगारी जगात सतत वावरत असतानाही त्यांनी मानवी जीवनातील अनेक रंग आणि ढंग यांच्यातून अगदी आरपार जात असतानाही त्यांनी जपलेला मनाचा हळवा कोपरा असं सारं आपल्याला दिसत राहतं. ज्या आमदारांच्या आधाराने जगाते आणि त्यांच्यासारखे अनेक उचापती खोर आपआपलं साम्राज्य उभं करत असतात. ते आमदार प्रत्यक्षात आपल्यासमोर पठारे कधीच आणत नाहीत. पण तरीही ते आमदार त्यांच्या साऱ्या गुणवैशिष्ट्यांसह आपल्यासमोर उभे राहतात. ही किमया लेखक रंगनाथ पठारे यांच्या लेखनीची होय...

या कादंबरीत विस्तीर्ण पट आहे. हा पट रेखाटताना वर्तमानाचा वेध ते घेतात. हा वेध घेताना शैलीत पाल्हाळपणाही जाणवतो. परंतु या पाल्हाळातही एक नियोजनपूर्ण विचार आहे. जो वर्तमान आणि त्यामध्ये कळसूत्री बाहुल्यासारखी वाटणारी, भासणारी विविध क्षेत्रातील माणसं, त्यांचे जीवन त्यांना मांडायचे आहे.

ते वर्तमान सामान्य माणसाच्या नजरेच्या आवाक्यात सहज येत नाही. याचं कारण आजच्या विलक्षण वेगावान जीवनातील कमालीची गुंतागुंत अत्यंत संघर्षमय वर्तमानातील चकित करणारी आणि संभ्रमात पाडणारी व्यामिश्रता होय.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या जंजळात हरवू पाहणाऱ्या मानवी मूल्यांसह अनेक गोष्टी... रस्त्याच्या कडेला उकिरड्यावर टाकून दिलेलं मूल सांभाळणारा दानियल आणि त्याची प्रेमळ पत्नी स्तेला यांच्यासारखी माणसं आजच्या काळात परिकथेतल्या व्यक्तिरेखेसारखी भासावीत इतकं आजचं जीवन कमर्शियल होऊन गेलं आहे. या साऱ्याचं वर्णन याच आजच्या आपल्या समाजातला कोणीही सामान्य माणूस करू लागला तर या अनेकरंगी वास्तवाचं चित्रण त्यालाही असंच करावे लागेल. आजच्या वर्तमानाचं चित्रण करतांना पठारे यांनी तीच शैली जाणीवपूर्वक स्वीकारली आहे. मात्र त्या शैलीचा विशेष हा की, त्यातही वाचक त्यांच्या नकळत गुंतत जातो.

कादंबरीतला लमुवेल आणि काही प्रमाणात बाणखेले हे आजच्या काळातही सहज आणि सरळ मनाचे प्रतिनिधी आहेत. बाणखेले यांचे व्यक्तिमत्त्व रंगतदार आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पदर आहेत. त्यातील काही त्यांच्या व्यवसायानं त्यांना दिले आहेत, तर काही त्यांच्या अंगभूत स्वभावानं. लमुवेलवर अफाट प्रेम करणारी तुंगाक्का हीसुद्धा आजच्या व्यापारी युगात अभावानंच दिसणाऱ्या जातिवंत प्रेमिकेची प्रतिनिधी वाटते. जकाते हा आजच्या तालुका किंवा जिल्हा पातळीवर अनेक उपद्व्याप करणाऱ्या आणि प्रस्थापितांच्या आश्रयाला राहून आपलं साम्राज्य उभं करणाऱ्या बेरकी, हिशोबी, पाताळयंत्री, लंपट राजकारण्याच प्रतिनिधी वाटतो.

जकातेंसारख्यांच्या गरजा ओळखणाऱ्या आणि त्यावर आपला स्वार्थ साधून घेणाऱ्या स्त्रियांचं दर्शनही या कादंबरीत घडतं. एका परीने पठारे यांनी वर्तमानाचा उभा आडवा छेदच घेतला आहे. तो घेताना कादंबरीतील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांच्या आयुष्यातील एकेका टप्प्यापर्यंत ते वाचकाला घेऊन गेले आहेत. अनेक गोष्टींच्या संभाव्यता दर्शविणारे हे टप्पेच वाचकाच्या मनात या कादंबरीचा पट पुन:पुन्हा जागा करतात. अस्वस्थ करतात. मात्र लामुवेल व तुंगाक्का यांची कहाणी वाचकाला आश्वस्त करणारी आहे. त्यामुळे ही पात्रे मनात घर करतात, लेखक पठारे यांचे हे यश होय.

**संदर्भ :**


- पठारे रंगनाथ : 'रथ', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वि.आ.२००४
- पठारे रंगनाथ : 'चक्रव्यूह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वि.आ. २००१
- बांदिवडेकर चंद्रकांत : 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वि.आ.१९९६
- सानप किशोर : 'मराठी कादंबरीतील नैतिकता', बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, प्र.आ. १९९८
- पठारे रंगनाथ : 'हारण', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९०, प्र.आ., पृ. १०५
- कोतापल्ले नागनाथ : 'साहित्याचा अन्वयार्थ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९९६
- पठारे रंगनाथ : 'टोकदार सावलीचे वर्तमान', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वि.आ.१९९८